निधन,राजीनामा,अनर्हता किंवा इतर अन्य कारणांमुळे ग्रामपंचायतीतील रिक्त झालेल्या पदांच्या पोट निवडणूकांसाठी पारंपारिक पध्दतीने राबविण्यात यावयाचा प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम..

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

**निवडणूक प्राथम्य**
**ई-मेलद्वारे**

क्रमांक: रानिआ/ग्रापंनि-२०२२/प्र.क्र.२/का-८,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २९/०४/२०२२

**प्रति,**
**सर्व जिल्हाधिकारी**
(मुंबई व मुंबई उपनगर जिल्हे वगळून),

**विषय :- निधन,राजीनामा,अनर्हता किंवा इतर अन्य कारणांमुळे ग्रामपंचायतीतील रिक्त झालेल्या पदांच्या पोटनिवडणूकांसाठी पारंपारिक पध्दतीने राबविण्यात यावयाचा निवडणूक कार्यक्रम**

संदर्भ :- आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक २२/०४/२०२२ चे मतदार यादी कार्यक्रम आदेश

महोदय,

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे पर्यवेक्षण ,संचालन व नियंत्रण याची सर्व जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे.

ii ) आयोगाच्या समक्रमांकाच्या संदर्भाधीन दिनांक २२/०४/२०२२ च्या आदेशान्वये निधन, राजीनामा, अनर्हता किंवा इतर अन्य कारणांमुळे रिक्त झालेल्या पदांच्या पोटनिवडणूका घेण्यासाठी दिनांक २८/०४/२०२२ रोजी प्रारुप मतदार यादी प्रसिध्द केली असून दिनांक ०५/०५/२०२२ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिध्द करण्यात येणार आहे.

iii) मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल रिट याचिका ८४१/२०२१ व इतर संलग्न याचिका, रिट याचिका क्रमांक १९७५६/२०२१ व इतर संलग्न याचिका व रिट याचिका १४१/२०२२ व इतर संलग्न याचिका विचारात घेता, **नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या रिक्त जागां भरण्यापूर्वी त्या अनारक्षित करुन सर्वसाधारण म्हणून अधिसूचित करुन महिलांसाठी ५० टक्के जागा आरक्षित ठेवणे यासाठी सोडत काढणे आवश्यक असल्याने या प्रक्रियेसाठी कालावधी लागणार आहे.**

iv) **सद्यस्थितीत केवळ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व सर्वसाधारण प्रवर्गाच्या रिक्त जागांच्या पोटनिवडणूकांसाठी** तसेच आयोगाने दिनांक १७/०१/२०२२ रोजी **कोविड १९ च्या अनुषंगाने निर्गमित केलेल्या सूचनांचे पालन करुन**, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम ( सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ ) मधील कलम १० अ पोटकलम (४) मधील अधिकारांचा वापर करुन, **दिनांक ०५/०५/२०२२ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिध्द होणाऱ्या ग्रामपंचायतींमधील रिक्त पदांचा पोटनिवडणुक कार्यक्रम राबविण्यासाठी आदेशित करण्यात येत आहे.**

## आदेश

१) **अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व सर्वसाधारण प्रवर्गाच्या रिक्त जागांच्या पोटनिवडणूका घेण्यात याव्यात.**

२) **नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गासाठी राखीव असलेल्या रिक्त जागा प्रथमत: सर्वसाधारण म्हणून अधिसूचित करणे आवश्यक असल्याने या जागा भरण्यासाठी स्वतंत्रपणे कार्यक्रम देण्यात येईल.**

३) **परिशिष्ट १** मध्ये दर्शविलेल्या वेळापत्रकानुसार **परिशिष्ट २** मध्ये दर्शविलेल्या ग्रामपंचायतींसाठी पोटनिवडणुका घेण्यात याव्यात.

४) निवडणुका असलेल्या ग्रामपंचायतींमध्ये, निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्यापासून निवडणूकीचा निकाल जाहीर होईपर्यंत आचारसंहिता लागू राहील. या क्षेत्रातील मतदारांवर विपरीत प्रभाव टाकणारी कोणतीही कृती/घोषणा मंत्री, खासदार, आमदार व संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेतील पदाधिकाऱ्यांना आचारसंहिता कालावधीत कुठेही करता येणार नाही.
( आयोगाचे आचारसंहितेबाबतचे दि. १४/१०/२०१६ चे एकत्रित आदेश, दि.०६/०९/२०१७ चे अतिरिक्त आदेश व दिनांक १७/१२/२०२० चे पत्र )

५) **या निवडणुकांसाठी नामनिर्देशनाची प्रक्रिया पारंपारिक पध्दतीने राबविण्यात यावी.**

६) सन २०२१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १४, दिनांक ०६ डिसेंबर, २०२१ अन्वये राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार सार्वत्रिक किंवा पोटनिवडणूक कार्यक्रमांकरिता नामनिर्देशनपत्र दाखल करण्याचा शेवटचा दिनांक हा ३१ डिसेंबर, २०२२ किंवा

त्यापूर्वीचा असेल, त्याबाबतीत नामनिर्देशनपत्रासोबत वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्यपत्र किंवा पडताळणी समितीकडे अर्ज केला असल्याबाबतचा अन्य कोणताही पुरावा आणि निवडून आल्याच्या दिनांकापासून १२ महिन्यांच्या आत पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करील, असे हमीपत्र सादर करण्याची मूभा उमेदवारांना दिली आहे.

७) परिशिष्ट १ येथील निवडणुक कार्यक्रमानुसार मतदानाची वेळ सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० अशी असेल. (मात्र नक्षलग्रस्त भागामध्ये उदा. गडचिरोली, गोंदीया करीता सकाळी ७.३० ते दुपारी ३.०० वा. पर्यंत)

८) निवडणूक कार्यक्रम सुरु झाल्यानंतर एखादया ग्रामपंचायतींच्या निवडणूकी संदर्भात मा. न्यायालयाचे किंवा विभागीय आयुक्त (अपीलासंदर्भात) यांच्या स्तरावरुन देण्यात आलेले स्थगिती आदेश प्राप्त झाल्यास,

- मा.न्यायालयाचे स्थगिती आदेशास जिल्हाधिकारी यांना त्यांच्या स्तरावर स्थगितीची कार्यवाही करता येईल.
- मात्र विभागीय आयुक्त यांनी दिलेल्या स्थगितीस अनुसरुन निवडणूक कार्यक्रम स्थगित करावयाचा असल्यास राज्य निवडणूक आयोगाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील.

९) ग्रामपंचायतींची निवडणूक प्रक्रिया अधिकाधिक पारदर्शी पध्दतीने पार पाडण्याच्या दृष्टीने आयोगाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या पूर्वतयारी आदेशातील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

१०) नवीनतम उपक्रम राबविण्यासंदर्भात वेळोवेळी देण्यात येणाऱ्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यात यावी.

११) **केंद्र व राज्य शासनाकडून कोविड -१९ च्या अनुषंगाने प्रतिबंधात्मक उपाययोजना व दक्षता घेण्याबाबतच्या सूचना / निर्बंध लागू झाल्यास आयोगाचे दिनांक १७/०१/२०२२ च्या आदेशातील मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.**

१२) राज्य निवडणूक आयोगाकडील संपर्क क्रमांक पुढील प्रमाणे -

| | |
|---|---|
| संकेत स्थळ | www.mahasec.maharashtra.gov.in |
| दूरध्वनी क्रमांक ( ग्रा.पं. शाखा) | ०२२-२२८४६७२० |
| दूरध्वनी क्रमांक (संगणकीकरण शाखा) | ०२२-२२८८६९५० |
| ई-मेल | sec.mh@gov.in |

सदरचा निवडणूक कार्यक्रम आयोगाच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

सोबत - परिशिष्ट - १ व परिशिष्ट २

( किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत:- १. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

२. अपर मुख्य सचिव, गृह विभाग/वित्त विभाग तसेच सर्व प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.

३.मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

४.पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई

५. प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
यांना कळविण्यात येते की, ग्रामपंचायत निवडणुकीसाठी आवश्यक अनुदान संबंधित जिल्हाधिकारी यांच्या मागणीचा विचार करुन त्यांना तात्काळ उपलब्ध करुन द्यावे.

६. विभागीय आयुक्त (सर्व) यांना उचित कार्यवाहीसाठी

७. संचालक, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

८.संचालक, शासकीय मुद्रणालय व लेखन सामग्री संचालनालय, चर्नी रोड, मुंबई ४०० ००४
यांना कळविण्यात येते की, निवडणुकांच्या अनुषंगाने संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना आवश्यक साधनसामग्री पुरविण्यात यावी. तसेच मतपत्रिका व इतर छपाई विहित वेळेत पूर्ण करुन देण्याची कृपया व्यवस्था करावी.

९.पोलिस महानिरीक्षक ( सर्व संबंधित), महाराष्ट्र राज्य

१०. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन यांना माहितीसाठी.

११. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).

१२. जिल्हा पोलिस अधिक्षक ( सर्व संबंधित)

१३. उपायुक्त, राज्य निवडणूक आयोग यांना मतदान साहित्याच्या उपलब्धतेसंदर्भात पुढील उचित कार्यवाहीसाठी.

१४. माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग

१५. राज्य निवडणूक आयोगातील निवडणूक कार्यासने.

१६. निवड नस्ती.

## परिशिष्ट १

(क्रमांक-रानिआ/ग्रापंनि-२०२२/प्र.क्र.०२/का.०८,दिनांक २९/०४/२०२२ च्या आदेशासोबतचे पत्र)

निधन,राजीनामा,अनर्हता किंवा इतर अन्य कारणांमुळे ग्रामपंचायतीतील रिक्त झालेल्या पदांच्या पोटनिवडणूकांसाठी पारंपारिक पध्दतीने राबविण्यात यावयाचा निवडणूक कार्यक्रम

| अ.क्र. | निवडणुकीचे टप्पे | दिनांक |
|---|---|---|
| १ | तहसिलदार यांनी निवडणुकीची नोटीस प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक ०५/०५/२०२२ (गुरुवार) |
| २ | नामनिर्देशनपत्रे मागविण्याचा व सादर करण्याचा दिनांक व वेळ (नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी) | दिनांक १३/०५/२०२२ (शुक्रवार) ते दिनांक २०/०५/२०२२ (शुक्रवार) वेळ सकाळी ११.०० ते दु . ३.०० (दिनांक १४/०५/२०२२ शनिवार, दिनांक १५/०५/२०२२ चा रविवार व दिनांक १६/०५/२०२२ ची सार्व. सुट्टी वगळून) |
| ३ | नामनिर्देशनपत्रे छाननी करण्याचा दिनांक व वेळ (नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी) | दिनांक २३/०५/२०२२ (सोमवार) वेळ सकाळी ११.०० वाजल्यापासून छाननी संपेपर्यंत |
| ४ | नामनिर्देशनपत्र मागे घेण्याचा अंतिम दिनांक व वेळ (नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी) | दिनांक २५/०५/२०२२ ( बुधवार ) दुपारी ३.०० वा. पर्यंत |
| ५ | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक २५/०५/२०२२ ( बुधवार ) दुपारी ३.०० वा. नंतर |
| ६ | आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक | दिनांक ०५/०६/२०२२ (रविवार) सकाळी ७.३० वा. पासून ते सायं.५.३० वा.पर्यंत (नक्षलग्रस्त भागांमध्ये सकाळी ७.३० वा. पासून ते दुपारी ३.०० वा. पर्यंत) |
| ७ | मतमोजणी व निकाल घोषित करण्याचा दिनांक (मतमोजणीचे ठिकाण व वेळ जिल्हाधिकाऱ्यांच्या मान्यतेने तहसिलदार निश्चित करतील त्यानुसार राहील) | दिनांक ०६/०६/२०२२ (सोमवार) |
| ८ | जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत निवडणुकीच्या निकालाची अधिसूचना प्रसिध्द करण्याचा अंतिम दिनांक | दिनांक ०९/०६/२०२२ (गुरुवार) पर्यंत |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार

( किरण कुरुंदकर )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

( क्रमांक - रानिआ/ग्रापंनि-२०२२/प्र.क्र.०२/का.०८, दिनांक २९/०४/२०२२ च्या आदेशासोबतचे सहपत्र )

## परिशिष्ट २

### रिक्त पदांच्या पोटनिवडणुका असलेल्या ग्रामपंचायतींचा जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त अहवालानुसार तपशिल

| अ.क्र. | जिल्हा | ग्रामपंचायतींची संख्या | एकूण रिक्त जागा (ना.मा.प्र. वगळून) |
|---|---|---|---|
| १ | ठाणे | ३३ | ६३ |
| २ | पालघर | २२ | ५३ |
| ३ | रायगड | १२३ | १७२ |
| ४ | रत्नागिरी | १२८ | १६४ |
| ५ | सिंधुदुर्ग | ७६ | ६० |
| ६ | नाशिक | १२२ | १८२ |
| ७ | धुळे | ४० | ४८ |
| ८ | जळगांव | १०० | ११३ |
| ९ | नंदुरबार | २५ | ३३ |
| १० | अहमदनगर | १०३ | १४० |
| ११ | पुणे | २२२ | २४३ |
| १२ | सोलापूर | ५४ | ४६ |
| १३ | सातारा | २१० | ४२१ |
| १४ | सांगली | ५३ | ४५ |
| १५ | कोल्हापूर | ६९ | ८५ |
| १६ | औरंगाबाद | ५८ | ४९ |
| १७ | बीड | ४६ | ३८ |
| १८ | नांदेड | १२८ | १८२ |
| १९ | उस्मानाबाद | ३३ | ३१ |
| २० | परभणी | २८ | १८ |
| २१ | जालना | ३२ | २७ |
| २२ | लातूर | ६८ | ७३ |
| २३ | हिंगोली | २९ | ३५ |
| २४ | अमरावती | ५८ | ८२ |
| २५ | अकोला | १२८ | २०७ |
| २६ | यवतमाळ | ० | ० |
| २७ | वाशिम | ९४ | १३७ |
| २८ | बुलडाणा | ६३ | ८० |
| २९ | नागपूर | ५३ | ५५ |
| ३० | वर्धा | ४३ | ५३ |
| ३१ | चंद्रपूर | ५१ | ५३ |
| ३२ | भंडारा | ४३ | ६२ |
| ३३ | गोंदिया | ४६ | ३४ |
| ३४ | गडचिरोली | ८९ | १६९ |
| | एकूण | २४७० | ३२५३ |

टीप - यवतमाळ जिल्हयांचा प्रारुप मतदार यादी प्रसिध्द केल्याचा अहवाल अप्राप्त आहे. तरी प्रारुप मतदार यादी प्रसिध्द केलेल्या रिक्त जागांमधून ना.मा.प्र. च्या जागा वगळून अनु. जाती., अनु. जमाती व सर्वसाधारण प्रवर्गाच्या रिक्त जागा भरण्यासाठी निवडणूक कार्यक्रम राबविण्यात यावा.